आकर्षक व दर्जेदार स्कीमसह
युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..
UCN

संपर्क :- 9129582958
पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

KAYASTH
Caters & Event Management

Rajendra Deochand Kayasth-9657572742 | 7350065657
Karanja Chowk,Shiv Shopping Complex,Buldana-443001

संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : ३३४ वा | शुक्रवार दि ०३ एप्रिल २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# बारामती पोटनिवडणुकीत ट्विस्ट,सुनेत्रा पवारांचा बिनविरोध विजयाचा मार्ग धूसर, काँग्रेस उमेदवार देणार...

**वृत्तसंस्था/बारामती**

उपमुख्यमंत्रिपदावर असताना बारामती येथे झालेल्या विमान अपघातात ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे निधन झाले. त्यामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. मात्र ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आता कमी झाली आहे. कारण काँग्रेस पक्षाने बारामतीसोबतच राहुरी या विधानसभा मतदारसंघातही पोटनिवडणुका लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या भूमिकेला पक्षश्रेष्ठींनी गुरुवारी मंजुरी दिल्याची माहिती समोर येत आहे. आता काँग्रेस कोणाला रिंगणात उतरवणार, याकडे सर्वांचं लक्ष आहे. सुनेत्रा पवार बारामतीतून रिंगणात बारामती आणि राहुरी या विधानसभा मतदारसंघांसाठी २३ एप्रिल रोजी मतदान होणार असून, ४ मे रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी त्या राज्यसभेच्या खासदारपदी विराजमान झाल्या. मात्र महाराष्ट्रांचं उपमुख्यमंत्रिपद भूषवताना राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा देऊन विधानसभा किंवा विधान परिषदेचे सदस्यत्व घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे त्या अजित दादांच्या बारामतीतून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. दरम्यान, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीत बारामती आणि राहुरी या दोन्ही जागा शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीने लढवल्या होत्या. बारामतीत सुनेत्रा पवार उमेदवारी करत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षाने त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. अद्याप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची भूमिका समोर आली नाही. परंतु वंचित बहुजन आघाडी आणि राष्ट्रीय समाज पक्ष काँग्रेसला पाठिंबा देण्याचे संकेत आहेत. लोकप्रतिनिधीच्या निधनानंतर पोटनिवडणूक लागली आणि दिवंगत व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्यालाच उमेदवारी दिली, तर बिनविरोध निवडणूक करण्याची राजकीय संस्कृती महाराष्ट्रात जपली जात होती. मात्र गेल्या काळात या परंपरेला छेद दिल्याचं चित्र काही ठिकाणी पाहायला मिळालंय. आताही अजितदादांसारख्या ताकदवान नेत्याच्या कुटुंबातील सदस्य, उपमुख्यमंत्री असलेल्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्याविरोधात बालेकिल्ला बारामतीतच शड्डू ठोकून काँग्रेसने मोठे धाडस दाखवले आहे. बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून येत्या ६ एप्रिल रोजी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत सुनेत्रा पवार आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बारामती शहर व तालुक्यात घोंगडी बैठकांनाफ्र सुरुवात झाली असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. गावागावात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधत सुनेत्रा पवार यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्यासाठी रणनीती आखली जात आहे.

# भाजप स्वबळाच्या तयारीत, शिंदेसेनेनंही कंबर कसली; श्रीकांत शिंदेंकडे मोठी जबाबदारी...

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने शिवसेनेने आतापासूनच कंबर कसली आहे. शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने पक्षाने राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांसाठी संपर्कप्रमुखांची घोषणा केली आहे. यात मुंबईत सहा लोकसभा मतदारसंघ आणि ठाणे लोकसभेची जबाबदारी शिवसेनेचे संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. भिवंडी व कल्याण लोकसभेच्या संपर्कप्रमुखपदी खासदार नरेश म्हस्केंची निवड करण्यात आली आहे. शिवसेनेकडून राज्यातील सर्व लोकसभा मतदारसंघांसाठी संपर्कप्रमुखांची घोषणा केली आहे. यात मुंबई उत्तर, मुंबई उत्तर पश्चिम, मुंबई उत्तर मध्य, मुंबई



दक्षिण मध्य, ईशान्य मुंबई व दक्षिण मुंबई या मुंबईतील सर्व सहा लोकसभा मतदार संघांच्या संपर्कप्रमुख पदाची खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे. खासदार डॉ. शिंदेंसोबत मंत्री योगेश कदम, आमदार निलेश राणे, माजी खासदार राहुल शेवाळे यांच्यावर मुंबईच्या लोकसभा मतदार संघांची जबाबदारी असेल. तसेच ठाणे लोकसभेचे संपर्क प्रमुखपददेखील खासदार डॉ. शिंदेंकडे सोपवण्यात आले आहे, असे पक्षाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे. महाराष्ट्र भाजप ला आता कुबड्यांची गरज नाही. २०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढेल आणि सत्तेचा सोपान गाठेल, अशी घोषणा गृहमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहांनी केली होती. त्यामुळे पुढील निवडणुकीत भाजप स्वबळावर लढणार ही बाब स्पष्ट आहे. भाजपचा एकला चलो रेचा पवित्रा लक्षात घेता शिंदेसेनेनंही आतापासूनच लोकसभेची तयारी सुरु केली आहे. त्यासाठी संपर्कप्रमुखांची घोषणा करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीला अद्याप तीन वर्षांचा कालावधी आहे. पण शिंदेसेनेनं त्यासाठी आतापासूनच तयारी सुरु केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बडगा उगारलाच पाहिजे!



मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा म्हणजे आर्थिक वर्षाची अखेर. बँका, वित्तीय संस्था, कॉर्पोरेट यांची हिशेब पूर्ण करण्याची घाई ३१ मार्च जवळ येतो, तशी वाढत जाते. मात्र या निमित्ताने सरकारच्या विविध खात्यांची वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पाद्वारे मंजूर झालेला निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याची धावपळ, याला काळा विनोदच म्हणायला हवे. जनतेकडून करसंकलनाच्या माध्यमातून सरकार जनकल्याणासाठी ज्या योजना जाहीर करते, त्यावर नियत व्यय म्हणून जो निधी अर्थसंकल्पात जाहीर होतो, तो पूर्णपणे खर्च होत नसेल तर ही सरकारसाठी मोठीच नामुष्की म्हणायला हवी. गेल्या चार-पाच वर्षांची योजनांवरील खर्चाची आकडेवारी पाहिली तर ती साधारण साठ टक्क्यांच्या आसपास दिसते. याचाच अर्थ चाळीस टक्के निधी योजनांवर खर्च करण्याची सरकाराची असमर्थता यातून दिसते. यंदाच्या आर्थिक वर्षात विविध योजनांवर ठरलेल्या निधीच्या केवळ साठ टक्केच खर्च करण्यातच राज्य सरकार यशस्वी ठरले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा खर्च केवळ एखाद टक्क्याने वाढला आहे. सर्वाधिक खर्च हा महिला व बालकल्याण विभागाचा झाला असून तो जवळपास ८२ टक्क्यांच्या आसपास आहे. याचे कारण महिला व बालकल्याण विभागाच्या आंतर्गत येणारी लाडकी बहीण योजना. सर्वाधिक कमी खर्च हा गृहनिर्माण विभागावर झालेला आहे. खरे तर सर्वाधिक शहरीकरण असलेल्या महाराष्ट्रात घरांची समस्या फार मोठी आहे. तरीही या विभागावर केवळ २२ टक्के सरकार खर्च होत असेल तर याला काय म्हणावे? याच पार्श्वभूमीवर आता मंत्रालयातील बाबूंचा उर्वरित ४० टक्के निधी कोणत्या ना कोणत्या चौकटीत बसवून खर्च करण्याचा आटापिटा सुरू आहे. रविवारी सुट्टी असतानाही शासन निर्णयांचे शतक सरकारने या निमित्ताने केले. सोमवारीदेखील मंजूर निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा खटाटोप सुरूच होता. एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता यावी म्हणून प्रशासकीय यंत्रणेसाठी १०० दिवसांचा व नंतर १५० दिवसांचा कृती आराखडा राबवण्यासारखा स्तुत्य उपक्रम घेतात. त्या अंतर्गत प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये जनताभिमुख कारभार करण्याची आपसात स्पर्धा व्हावी यासाठी पुरस्कार दिले जातात, तरीही मंजूर निधीच्या ६० टक्केच खर्च का होतो? सरकार कुणाचेही असो, प्रशासनातील आळस, कामाप्रति असलेला कंटाळा, जनतेच्या प्रश्नांप्रति नसलेली आपुलकी हीच यामागची कारणे आहेत. कोणताही प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागती कामा नये, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावून सांगितल्यानंतरही दर वर्षी निधी खर्च करण्यात प्रशासन असमर्थ ठरत असेल तर मुख्यमंत्र्यांनी ढिम्म प्रशासनाला जागे करण्यासाठी बडगा उगारणे गरजेचेच आहे. कंत्राटे देताना होणारी अनागोंदी हे देखील यामागील एक कारण. कंत्राटे देण्याचे काही निकष असले तरी प्रत्यक्षात ती देताना वेगळेच निकष लावले जातात. यामागे अर्थकारण व राजकारण या दोन्ही बाबी असतात. मात्र काहीही झाले तरी ठरलेले काम पूर्ण करणे इतकी किमान अपेक्षा कररूपाने सरकारी तिजोरी भरणाऱ्या जनतेची असते. सरकारी कामांच्या दर्जाबाबत जनता किती सहनशील आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र कमी प्रतीची का असेनात, जनोपयोगी कामे व्हायला हवीत, इतकीही किमान अपेक्षा जनतेने ठेवायची नसेल तर जनतेला लोकशाहीच्या सबळीकरणासाठी मतदान करण्याचे आवाहन कशासाठी करायचे? अर्थसंकल्पाच्या सुरुवातीलाच सगळ्याच खात्यांच्या योजनांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पात नियत व्यय काय असेल हे ठरवले जाते. सुमारे साडेसात लाख कोटी आकारमान असलेला महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात विविध खात्यांना मिळालेला निधी कधीच पुरत नाही. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात यामुळेच अवाढव्य आकारमानाच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेतल्या जातात. सगळ्याच खात्यांच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी पुरा पडत नाही व त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर करून घ्याव्या लागतात, तर या मंजूर झालेल्या निधीतील केवळ ६० टक्केच निधी प्रशासनाकडून खर्च होणे व त्यासाठी मार्चअखेर आला की शेवटच्या तीन चार दिवसांत काही ना काही कारणे देत शेकडो शासन निर्णय जारी करणे, हे सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. त्यामुळे आता तरी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केवळ तंबी न देता, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारल्याशिवाय प्रशासनाला जाग येणार नाही, याची त्यांनी दखल घेतलेली बरी!




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# लाडकी बहीण योजनेत 71 लाख महिला अपात्र

## अपात्र लाभार्थ्यांवर २० महिन्यांत २१,३०० कोटी खर्च



**अपात्र महिलांचा लाभ आता बंद..** लाडकी बहीण योजनेत तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्यानंतर आता या महिलांना एप्रिल २०२६ पासून योजनेचा लाभ मिळणे बंद होईल. यामुळे सरकारचे दरमहा १,०६५ कोटी रुपये वाचणार असले, तरी गेल्या २० महिन्यांत झालेले २१ हजार कोटींचे नुकसान कसे भरुन काढायचे, असा प्रश्न प्रशासनासमोर आहे. तसेच, या अपात्र महिलांकडून ही रक्कम वसूल केली जाणार का? किंवा यावर सरकार काय पावले उचलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मुंबई/वृत्तसंस्था :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीनंतर करण्यात आलेल्या पडताळणीमध्ये तब्बल ७१ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत. सुरुवातीला पात्रतेचे निकष शिथिल ठेवल्यामुळे आणि अर्जांची पडताळणी प्रलंबित ठेवल्यामुळे हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या अपात्र लाभार्थ्यांवर सरकारने गेल्या २० महिन्यांत सुमारे २१,३०० कोटी रुपये खर्च केले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी जुलै २०२४ मध्ये ही योजना सुरू केली होती. तेव्हा या योजनेला महिलांचा प्रतिसाद प्रचंड होता. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी ही योजना सुरू केली होती. सुरुवातीच्या काळात या योजनेचा लाभ जास्तीत जास्त महिलांपर्यंत पोहोचवण्यासाठी अर्जांची छाननी न करता अर्ज भरणाऱ्या प्रत्येक महिलेला १५०० रुपये देण्यास सुरुवात झाली. अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ही संख्या २ कोटी ४७ लाखांवर पोहोचली होती. या सर्व महिलांना पात्र समजून त्यांच्या खात्यात दरमहा अनुदान जमा करण्यात आले. निवडणुकांचे वातावरण आणि योजनेची लोकप्रियता पाहता, प्रशासनाने सुरुवातीला अर्जांची सखोल छाननी केली नाही. अर्ज भरा आणि लाभ मिळवा या धर्तीवर अंमलबजावणी सुरू केली. यामुळे पात्रतेच्या निकषात न बसणाऱ्या महिलांचे अर्जही मंजूर झाले. या योजनेअंतर्गत प्रत्येक महिलेला दरमहा १,५०० रुपये अद्यापही दिले जातात. मात्र आता महिला व बाल विकास विभागाच्या पडताळणीत असे आढळले की या लाडकी बहीण योजनेत तब्बल ७१ लाख अपात्र लाभार्थी महिलांचा समावेश आहे. या महिलांना दरमहा दिले जाणारे १,०६५ कोटी रुपये हे नियमानुसार चुकीचे होते. नोव्हेंबर २०२४ पासून सलग २० महिने हा लाभ दिला गेल्याने, एकूण आकडा २१,३०० कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मार्च अखेरपर्यंत चाललेल्या या विशेष पडताळणी मोहिमेत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. वार्षिक २.५ लाख रुपयांच्या उत्पन्न मर्यादेत न बसणाऱ्या अनेक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. एकाच लाभार्थ्याने वेगवेगळ्या माध्यमातून किंवा आधार कार्डमधील त्रुटींचा फायदा घेत दोनदा लाभ मिळवला. कुटुंबात सरकारी नोकरी किंवा पेन्शन असतानाही अनेक अर्ज दाखल झाले होते.

## शेतकरी महिलांना शैलेश सावजी यांचा ‘मदतीचा हात

**डोणगाव :** परिसरात सामाजिक बांधिलकी जपत, विधवा व अल्पभूधारक शेतकरी महिलांसाठी एक अत्यंत स्तुत्य आणि भावनिक उपक्रम राबविण्यात येत आहे. शैलेश सावजी यांच्या पुढाकारातून या महिलांना शेतीसाठी मोफत नांगरणी करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, गरजू कुटुंबांसाठी हा उपक्रम आशेचा किरण ठरत आहे. या उपक्रमाअंतर्गत पात्र महिलांना त्यांच्या शेतजमिनीवर कोणताही आर्थिक भार न टाकता सुमारे १ हेक्टर (२.५ एकर) क्षेत्रावर मोफत नांगरणी करून दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, हा संपूर्ण उपक्रम स्वतःच्या खर्चातून राबविला जात असून, यात ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्वावर काम केले जात असल्याचे सांगण्यात येते. योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अटी निश्चित करण्यात आल्या आहेत. लाभार्थी महिला ही डोणगाव परिसरातील असावी, ती अल्पभूधारक असावी तसेच तिच्याकडे नियमित उत्पन्नाचे दुसरे साधन नसावे. याशिवाय, तिची मुले शिक्षण घेत असावीत, अशी अटही ठेवण्यात आली आहे. या निकषांमुळे खऱ्या अर्थाने गरजू आणि पात्र महिलांपर्यंत मदत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमामुळे अनेक विधवा महिलांच्या आयुष्यात नवी ऊर्जा निर्माण होणार असून, त्यांच्या शेतीला चालना मिळणार आहे.

## छत्रपती ताराराणींच्या समाधीस्थळी उभारणार जागतिक दर्जाचे स्मारक

**जालना/वृत्तसंस्था :** रणरागिणी छत्रपती ताराराणी यांच्या सातारा जिल्ह्यातील संगम माहुली येथील समाधीस्थळी भव्य आणि जागतिक दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासाठी तातडीने सविस्तर आराखडा तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित यंत्रणांना दिले असून, या प्रकल्पासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



या संदर्भात मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखे यांच्यासह विविध पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्र्यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी समाधीस्थळाची सध्यस्थिती, ऐतिहासिक वारशाचे जतन आणि परिसराच्या विकासाबाबत मुद्दे मांडण्यात आले.

यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पर्यटनमंत्री शंभुराजे देसाई यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. तज्ज्ञ इतिहासकार आणि वास्तुविशारदांची समिती स्थापन करून स्मारकाचा आराखडा तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.


या प्रकल्पांतर्गत संगम माहुली परिसराचा विकास पर्यटनस्थळ म्हणून करण्यात येणार असून, ताराराणींच्या शौर्यगाथेचा जागतिक स्तरावर प्रचार करण्याचा मानस आहे. तसेच त्यांच्या कार्याच्या अभ्यासासाठी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात स्वतंत्र अभ्यासकेंद्र स्थापन करण्याचाही प्रस्ताव आहे.

## अर्धा तास सुनावणी अन् ‘तो’ निर्विकार चेहरा !

**नाशिक/वृत्तसंस्था :** विवाहितेच्या लैंगिक शोषण प्रकरणी दुसऱ्या गुन्ह्यात अटक झालेल्या भोंदूबाबा अशोक खरातला गुरुवारी येथील जिल्हा व सत्र न्यायालयात ‘व्हिडिओ कॉन्फरन्सिंग’च्या माध्यमातून हजर करण्यात आले. अर्धा तासपेक्षा अधिक चाललेल्या सुनावणीत खरात प्रारंभी काही काळ हात जोडून उभा होता. न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नांना त्याने थोडक्यात उत्तरे दिली. चेहरा निर्विकार होता. अपराधीपणाचे कोणतेही भाव किंवा दडपणही जाणवले नाही.

महिला अत्याचार प्रकरणी पहिल्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या खरातला दुसऱ्या गुन्ह्यात विशेष तपास पथकाने अटक केली. खरातला न्यायालयात आणल्यावर मोठी गर्दी उसळते. मध्यंतरी काही सामाजिक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी त्याच्यावर हल्ल्याचा प्रयत्न केला होता. सुरक्षिततेच्या कारणास्तव विशेष तपास पथकाने (एसआयटी) गुरुवारी खरातला ‘व्हिडिओ कॉन्फरन्सिंग’द्वारे न्यायालयात हजर केले. मुख्य न्यायदंडाधिकारी बी. एन. इचपुराणी यांच्या न्यायालयात सुनावणी झाली.

खरात हात जोडून न्यायालयासमोर उभा होता. यावेळी पहिल्या गुन्ह्यात खरातची बाजू मांडणारे ॲड. सचिन भाटे हे उपस्थित होते. दुसऱ्या गुन्ह्यात बाजू मांडण्यासाठी वकीलपत्रावर खरातची स्वाक्षरी नव्हती. दृकश्राव्य माध्यमातून त्याला हजर केल्यामुळे स्वाक्षरी होणे शक्य नव्हते. ही बाब सुनावणीपूर्वीच त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणली होती. न्यायाधीश इचपुराणी यांनी संशयिताला नाव विचारले. त्यावर खरातने उत्तर दिल्यानंतर न्यायालयाने या प्रकरणात ॲड. सचिन भाटे हे वकील म्हणून तुमची बाजू मांडू इच्छितात, याची कल्पना देताच खरातने लगेच संमती दिली. त्यानंतर सुनावणीला सुरूवात झाली. एसआयटीचे तपास अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी आणि सहायक सरकारी वकील शैलेंद्र बागडे यांनी दुसऱ्या गुन्ह्याचे गांभिर्य, प्रदीर्घ काळ पीडितेवर झालेला अत्याचार, गोळ्या देऊन तिचा गर्भपात, एका व्यक्तीला देण्यासाठी बाटलीत दिलेले दिव्य



जडीबुटीचे औषध, पीडितेसह आई-वडिल व भावाचे घेतलेले आधार कार्ड, पॅनकार्ड आणि छायाचित्रांचाविषयी माहिती देऊन या तपासासाठी सात दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली.

हा संपूर्ण युक्तिवाद सुरू असताना खरात निर्विकारपणे ऐकत होता. त्याच्या चेहऱ्यावर कुठलेही हावभाव नव्हते. काही काळ जोडलेले हात नंतर त्याने समोर धरले होते. बचाव पक्षाच्या वकिलाचा युक्तिवाद संपल्यानंतर न्यायालयाने संशयित खरातकडे काही बोलायचे आहे का, तुमच्यावतीने वकिलांनी मांडलेले पुरेसे आहे का, अशी विचारणा केल्यावर त्याने ते पुरेसे असल्याचे सांगितले.

## ‘आप’कडून डच्चू मिळाल्यानंतर राघव चड्ढा यांची पहिली पोस्ट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** एकेकाळी अरविंद केजरीवाल यांचे सर्वात विश्वासू सहकारी राहिलेले आणि आम आदमी पक्षाचे ‘पोस्टर बॉय’ म्हणून ओळखले जाणारे खासदार राघव चड्ढा यांना राज्यसभेच्या उपनेतेपदावरून हटवण्यात आले आहे. यानंतर ‘आप’चे खासदार चड्ढा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर केल्या पोस्टला कॅप्शन म्हणून ‘इव्हिल आय’ इमोजीसह एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये त्यांनी आजवर राज्यसभेत उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांची झलक दाखवण्यात आली आहे.

राघव चड्ढा या व्हिडीओमध्ये म्हणताना दिसत आहेत की, “या देशातील मध्यमवर्ग जीवतोड मेहनत करतो, पण इतकी मेहनत करूनही मध्यमवर्ग श्रीमंत नाही तर गरीबच होत चालला आहे. डेटासाठी आमच्याकडून जेवढे पैसे घेतले जातात, तेवढा डेटा आम्हाला वापरू दिला पाहिजे. तो एक्सपायर होऊ नये, हा डेटा आमच्या कष्टाच्या पैशातून खरेदी केलेला डेटा आहे.”

राघव चड्ढा या व्हिडीओमध्ये पुढे म्हणतात की, “मी प्रीपेड मोबाईल वापरकर्त्यांच्या वतीने दोन मुद्दे उपस्थित करू इच्छितो. पहिली समस्या म्हणजे रिचार्ज संपल्यानंतर आउटगोइंगबरोबर इनकमिंग सेवा देखील बंद होणे. दुसरी समस्या म्हणजे टेलिकॉम ऑपरेटर्सचा २८ दिवसांचा रिचार्ज. या जीवनात दोनच गोष्टी निश्चित आहेत, मृत्यू आणि कर. देशभरात आपण पाहिले की कशाप्रकारे पेपर लीक झाले आणि कशाप्रकारे मुलांचे भविष्य आज अंधकाराच्या उंबरठ्यावर उभे आहे. वायू प्रदूषणाचा सर्व दोष मात्र शेतकऱ्यांच्या माथी मारला जातो, म्हणून मी आज त्या शेतकऱ्यांचा मुद्दा उपस्थित करू इच्छितो. मी सरकारकडे मागणी करतो की, लाईफ इन्शुरन्स आणि हेल्थ इन्शुरन्स यावर तरी किमान जीएसटी लावू नये. हे काही लक्झरी प्रॉडक्ट्स नाहीत. आज विमानतळावरील जेवण इतके महाग आहे, यावर कोणतेही नियंत्रण असू नये का? झोमॅटो आणि स्विगीच्या डिलिव्हरी बॉईजचे दुःख मला सभागृहात मांडायचे आहे,” असे अनेक मुद्दे राघव चड्ढा राज्यसभेत मांडताना या व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहेत. राघव चड्ढा यांची पक्षाच्या उपनेतेपदावरून हटवण्यात आल्यानंतर त्यांच्या जागी पंजाबचे अशोक मित्तल यांची नियुक्ती करण्यात येत आहे.



# सातार्‍यात पुन्हा वादळी पावसाचा धुमाकूळ, वीज कोसळून शेतकर्‍याचा मृत्यू, महामार्गावर वाहनचालकांची कसरत

**सातारा :** सातारा जिल्ह्यात सलग चौथ्या दिवशी वादळी पावसाने हाहाकार माजवला. अनेक तालुक्यात दुपारीच ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटात वादळी पाऊस झाला. त्यामध्ये माण तालुक्यातील वृद्ध शेतकर्‍याचा अंगावर वीज कोसळून जागीच मृत्यू झाला. लाला दाजी जाधव (वय ६५, रा. तोंडले, ता. माण, जि. सातारा), असे मृत शेतकर्‍याचे नाव आहे. दरम्यान, पुणे-बंगळुरू आणि गुहागर-विजापूर या महामार्गावर पाणी साचल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागली.

लाला जाधव हे तोंडले गावातील 'बाशिंग' नावाच्या शिवारात काम करत असताना दुपारी विजांचा कडकडाट सुरू झाला आणि अंगावर वीज कोसळून ते जागीच मृत्युमुखी पडले. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह दहिवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गेल्या चार दिवसांपासून वाई खंडाळा मान खटाव या तालुक्यांमध्ये विजांच्या कडकडाटात वादळी पाऊस पडत आहे. त्यामध्ये सुमारे 35 शेळ्या-मेंढ्या, एक महिला आणि एका शेतकर्‍याचा वीज पडून मृत्यू झाला आहे.



शासकीय कार्यालये आणि घरांवरील सोलर पॅनलना वादळी वारे आणि गारपिटीचा मोठा फटका बसला आहे. गारपिटीच्या तडाख्याने सोलर पॅनल फुटून मोठे नुकसान झाले आहे. तसेच गारांमुळे वाहनांच्या काचा देखील फुटल्या आहेत. गेल्या चार दिवसांपासून वेगवेगळ्या भागांमध्ये वादळी पावसाने हजेरी लावली आहे. गुरुवारी दुपारी कराड तालुक्यातील दक्षिण मांड खोरे आणि कोयनाकाठ परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे पुणे-बंगळुरू आणि गुहागर-विजापूर महामार्गावर पाणी साचले होते. त्यातून मार्ग काढताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागली.

पुणे जिल्ह्यालादेखील पावसाने चांगलंच झोडपलं आहे. अवकाळी पावसामुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. अनेक ठिकाणी गारपीट झाल्यामुळे शेतकर्‍यांची मोठी हानी झाली आहे. तसेच पुणे शहरातही पावसाचा प्रकोप बघायला मिळाला आहे. पुणे शहरात सलग तिसर्‍या दिवशी मुसळधार पाऊस पडला. काही ठिकाणी गारपीटही झाल्याचा अंदाज आहे. मुसळधार पावसामुळे पुण्यात सर्वत्र पाणी शिरलेलं बघायला मिळालं. या दरम्यान, वादळी वाऱ्यामुळे झाड कोसळून एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. तसेच शहरात काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याची घटना घडली. तसेच काही भागांमध्ये घरात पाणी शिरल्याची घटना घडली.

## 15 वर्षांची नवरी, 35 वर्षांचा नवरदेव, नागपुरात बाल संरक्षण विभागाने रोखला बालविवाह

**नागपूर :** बालविवाहांना बंदी असताना काही ठिकाणी बालविवाह करण्याचे प्रकार घडतात. सरकारने मुलगा आणि मुलीच्या लग्नासाठी नियम ठेवले आहेत. त्या नियमानुसार योग्य वयात मुलगा आणि मुलीचं लग्न होणं अपेक्षित असतं. पण काही ठिकाणी अल्पवयीन मुलींचं जास्त वयाच्या व्यक्तीसोबत लग्न लावलं जातं. यामुळे भविष्यात मुलीच्या आयुष्यावर त्याचे खूप वाईट परिणाम पडतात. मुलीच्या आरोग्यावरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे मुलींच्या सुरक्षेसाठी बाल संरक्षण विभागाकडून अशा प्रकारच्या घटनांना आळा घातला जातो. कुठे बालविवाहाची घटना घडल्यास बाल संरक्षण विभागाकडून संबंधित विवाहस्थळी धाड टाकून ते लग्न मोडण्यात येतं. एवढंच नाही तर अशा प्रकारचं लग्न जमावणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली जाते. नागपूरमध्ये अशीच एक मोठी कारवाई करण्यात आली आहे.नरखेड तालुक्यातील मालापूर येथे एका धार्मिक कार्यक्रमात १५ वर्षांची नवरी आणि ३५ वर्षांचा नवरदेव असा विवाहाचा घाट घालण्यात आला होता. मात्र प्रशासनाच्या सतर्कतेमुळे हा बालविवाह रोखण्यात आला. आठवीत शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीचा बालविवाह करण्यात येत असल्याची माहिती बाल संरक्षण कक्षाला प्राप्त झाली. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कारवाईसाठी पाऊल उचलले. कोंढाळी पोलिसांनाही याबाबत कळविण्यात आले. पोलिसांच्या मदतीने मुलीची सुटका करण्यात आली. या विवाहात सहभागी असणाऱ्यांवरही कारवाई होऊ शकते, असे बालसंरक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

नरखेड पोलिसांनी या विवाहात दोषी असलेल्यांवर बालविवाह प्रतिबंध अधिनियम कायद्यांतर्गत, बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे.या कारवाईमध्ये जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील मेसरे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुस्ताक पठाण, पोलिस निरीक्षक मंगला मोकाशी, जिल्हा बाल रक्षक समन्वयक प्रसेनजीत गायकवाड तसेच चाइल्ड लाइन प्रतिनिधी मीनाक्षी धडाडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.सुटका केलेल्या मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तिला पुढील काळजी आणि संरक्षणासाठी बालगृहात दाखल करण्यात येणार आहे.

## मराठवाड्यात 5345 हेक्टर बाधित, चौघांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर :** गेल्या तीन दिवसात झालेला अवकाळी पाऊस आणि काही भागात झालेल्या गारपिटीमुळे मराठवाड्यातील पाच हजार ३४५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांसह फळबागांना फटका बसला आहे. यात सर्वाधिक म्हणजे ३ हजार ३४० हेक्टरवरील नुकसान एकट्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झाले आहे.विभागात १६ ते २० मार्चदरम्यान छत्रपती संभाजीनगर, बीड, जालनासह अन्य काही भागांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यात अनेक भागात गारपीटदेखील झाली. या विभागातील ११ हजार ५७२ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाली. यात ६ हजार ९४४ हेक्टरवरील बागायत क्षेत्रास; तसेच १ हजार २२९ हेक्टरवरील फळपिकांनादेखील फटका बसला आहे. बाधित गावांची संख्या ५३३ असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या २० हजार ८९६च्या घरात आहेविभागीय आयुक्तालयाच्या अहवालानुसार ३० मार्च ते आतापर्यंत (३ एप्रिल सकाळच्या सत्रापर्यंत) पावसामुळे विभागातील २०९ गावांतील ८ हजार ७८० शेतकरी बाधित झाले आहेत. त्यांच्या एकूण ५ हजार ३४५ हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे.

## केबलवाले जगतापांचा शॉक लागून मृत्यू

**बारामती :** बारामती तालुक्यातील माळेगाव परिसरातून एक अत्यंत दुर्दैवी घटना समोर आली आहे. गारपिटीमुळे विस्कळीत झालेली केबल सेवा दुरुस्त करताना वीजेचा तीव्र धक्का लागून एका ४५ वर्षीय व्यावसायिकाला आपला जीव गमवावा लागला आहे. राहुल उर्फ पप्पू नारायण जगताप असे या मृत व्यक्तीचे नाव असून, या घटनेमुळे माळेगाव बुद्रुक आणि परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, माळेगाव परिसरात काल सायंकाळच्या सुमारास जोरदार वाऱ्यासह गारपीट झाली होती. या अवकाळी पावसामुळे अनेक ठिकाणच्या केबल वाहिन्या तुटल्या होत्या. राजे अमरसिंह कॉलनी येथील केबलची वायर तुटल्याने ती दुरुस्त करण्यासाठी राहुल जगताप तिथे गेले होते. वायर दुरुस्त करण्याचे काम सुरू असतानाच अचानक त्यामध्ये विद्युत प्रवाह उतरला. विद्युत धक्का लागल्यानंतर स्थानिक नागरिकांनी त्यांना तातडीने मदतीसाठी धावून येत प्रथम माळेगाव येथील रुग्णालयात नेले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी बारामतीला हलवण्याचा सल्ला दिला. दुर्दैवाने, बारामतीला नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर मोठा आघात झाला



आहे. राहुल जगताप हे माळेगाव परिसरात 'पप्पू' या नावाने परिचित होते. केबल व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचा अनेक घरांशी जवळचा संबंध होता. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावामुळे परिसरात त्यांची चांगली ओळख होती. त्यांच्या निधनाची बातमी समजताच माळेगावमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, वडील, भाऊ आणि वहिनी असा मोठा परिवार आहे. घराचा कर्ता पुरुष गेल्याने जगताप कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी युवराज सदाशिव जेधे यांनी माळेगाव पोलीस ठाण्यात माहिती दिली असून, पोलिसांनी या घटनेची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद केली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. अवकाळी पाऊस आणि वीजेच्या उघड्या तारांमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी आता स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# आईला भेटायला जाताना लेकीवर काळाची झडप, भीषण अपघातात चंचलचा मृत्यू

**जळगाव :** दुचाकीवर आईला भेटण्यासाठी जात असतानाच चंचल लांडगे (वय २१) या तरुणीचा डंपरने दिलेल्या धडकेत जागीच मृत्यू झाला. तर तिच्यासोबत असलेली मैत्रीण वैष्णवी चौधरी ही गंभीर जखमी झाली तिच्यावर उपचार सुरू असून नागरिकांनी आज महामार्ग रोखून धरला.चाळीसगाव तालुक्यातील धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग जाणाऱ्या दसेगाव फाट्याजवळ एक भयानक भीषण अपघात झाला आहे. चंचल लांडगे आणि तिची मैत्रीण वैष्णवी चौधरी ही दोघेही चंचलच्या आईला भेटण्यासाठी दुचाकीवर जात होते. वाळूच्या डंपरने त्यांच्या दुचाकील जोरदार धडक दिल्यानं चंचलच्या डोक्याला जबर मार लागल्याने डंपर खाली चिरडून



तिचा मृत्यू झाला, तर तिची मैत्रीण वैष्णवी ही जखमी झाली आहे.दोघेही धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील दसेगाव फाट्याजवळ पोहोचल्या असताना अचानक पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या डंपरने दुचाकीला मागून धडक दिली. डंपरची धडक बसल्यामुळे तरुणी खाली पडल्या या अपघातात चंचल लांडगे हिचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात इतका भीषण होता की डंपरने काही अंतर दूर दोघींना फरफटत नेलं. या अपघातात चंचलची मैत्रीण वैष्णवी चौधरी ही तरुणी गंभीर जखमी झाली आहे. जखमी झालेल्या वैष्णवीला तातडीने रुग्णालय उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे तिच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.अपघातानंतर नागरिकांनी महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करत संताप व्यक्त केला. त्यानंतर घटनास्थळी पोलीस दाखल झाले. पोलिसांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं असलं, तरी आरोपींना वाचवण्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. संबंधित डंपरमध्ये अवैध वाळू असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी डंपर ताब्यात घेत चालक आणि क्लिनरला अटक केली आहे. काही दिवसांपूर्वी जळगाव जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी अपघात झाला होता. जळगावच्या धरणगाव येथे धरणगाव नगर परिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा प्रतिभा चौधरी यांचे पुत्र अविनाश चौधरी यांचे अपघाती निधन झालं. या घटनेमुळे धरणगाव तालुक्यात शोककळा पसरली आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी बचाव कार्याला सुरुवात केली. पण अपघाताची घटना इतकी भीषण होती की, अविनाश चौधरी यांचा जागीच मृत्यू झाला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ईशान किशनकडून सर्व संघाचे कौतुक; पण सर्वाधिक विकेट काढणाऱ्याचा उल्लेखही केला नाही



**कोलकाता/वृत्तसंस्था** : सनरायझर्स हैदराबादनेही आयपीएल 2026 मध्ये आपल्या विजयाचे खाते उघडले आहे. हैदराबादने आयपीएल 2026 च्या सहाव्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सवर दणदणीत विजय मिळवला. ईडन गार्डन्सवर झालेल्या या हाय-स्कोअरिंग सामन्यात प्रथम फलंदाजी करताना हैदराबादने 20 षटकांत 8 गडी गमावून 226 धावा केल्या, परंतु चांगली सुरुवात करूनही कोलकाता नाईट रायडर्सला फारसा प्रभाव पाडता आला नाही आणि त्यांना सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. सामना जिंकल्यानंतर कॅप्टन ईशान किशन काय म्हणाला ते पाहा.

ईशान किशनने सांगितले की, "मी विजयाने आनंदी आहे आणि याचे श्रेय संघाच्या एकजुटीला देतो, जिथे प्रत्येकाने आपले सर्वोत्तम प्रयत्न करून योगदान दिले. खेळपट्टीवर फलंदाजी करणे सोपे नव्हते, परंतु संघासाठी उत्तम वातावरण निर्माण केल्याबद्दल त्याने ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्माचे कौतुक केले. किशनने कबूल केले की फिन ॲलनसारख्या खेळाडूला रोखणे नेहमीच कठीण असते, परंतु तो संघाच्या गोलंदाजीच्या कामगिरीवर विशेषतः खूश होता."ईशानने, "देशांतर्गत क्रिकेटमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या हर्ष दुबे आणि मोठ्या उत्साहाने उत्कृष्ट गोलंदाजी करणाऱ्या शिवांग कुमार यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. ईशान म्हणतो की संघ सातत्याने सुधारणेला वाव असलेल्या क्षेत्रांचा शोध घेत आहे; क्षेत्ररक्षण हा असाच एक पैलू आहे ज्यावर त्यांना भविष्यात एकत्रितपणे काम करायचे आहे." जयदेवने सर्वाधिक विकेट काढूनही ईशानने त्याचे कौतुक केले नाहीनाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाला अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांच्यामुळे दमदार सुरुवात मिळाली. अभिषेक शर्माने 21 चेंडूंमध्ये 48 धावा, तर ट्रॅव्हिस हेडने 21 चेंडूंमध्ये 46 धावा केल्या. दोघांनी मिळून 34 चेंडूंमध्ये 82 धावांची स्फोटक भागीदारी केली.

त्यानंतर हेनरिक क्लासेनने 52 धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. दरम्यान, नितीश कुमार रेड्डीने 39 धावांची स्फोटक खेळी करून संघाला ही धावसंख्या गाठण्यास मदत केली. हैदराबादकडून सर्वाधिक 3 विकेट जयदेव उनादकटने काढल्या. नितीश कुमार रेड्डीने आणि ईशान मलिंगाने प्रत्येकी 2 विकेट काढल्या. हर्ष दुबेल एक विकेट काढण्यात यश मिळाले.

# सलग दुसरी मॅच केकेआरने गमवाली; सामन्यातील पराभवामागे जबाबदार कोण?



**कोलकाता/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 हंगामाच्या दुसऱ्या सामन्यात केकेआरला सलग दुसऱ्या पराभवाला सामोरे जावे लागले. सनरायझर्स हैदराबादकडून अभिषेक शर्मा (48), ट्रॅव्हिस हेड (46) आणि हेनरिक क्लासेन (52) यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. 226 धावा केल्यानंतर हैदराबादने केकेआरला त्यांच्याच घरच्या मैदानावर 161 धावांवर रोखले. जयदेव उनाडकटने तीन बळी घेत संघाला 65 धावांनी मोठा विजय मिळवून दिला. केकेआरकडून केवळ अंगक्रिश रघुवंशी धावाच 52 करू शकला. सामना गमावल्यानंतर कर्णधार अजिंक्य राहणे काय म्हणाले ते पाहा.

कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार अजिंक्य रहाणे म्हणाला की, "आमच्या संघात काही भागीदारी झाल्या, पण जे खेळाडू स्थिरावले होते त्यांनी शेवटपर्यंत फलंदाजी करायला हवी होती. हैदराबादच्या वेगवान सुरुवातीनंतर, आमच्या संघाने गोलंदाजीच्या जोरावर जोरदार पुनरागमन केले. पहिल्या दहा षटकांत हैदरादने 130 हून अधिक धावा केल्या असूनही, त्यांना 230 धावांच्या आत रोखणे ही संघासाठी एक उल्लेखनीय कामगिरी होती." रहाणेंनी स्पष्ट केले की जे खेळाडू स्थिरावले होत ते खेळाडयला हवे होते म्हणजे अंगकृश आणि रिंकू सिंग यांची नाव न घेता रहाणेंनी आता त्यांच्या निशाणा साधला आहे.

रहाणेने सांगितले की, दु"सऱ्या डावात चेंडू थोडा हळू येत होता आणि स्लोअर बॉल्सना चांगली पकड मिळत होती. त्याने हैदराबाजच्या गोलंदाजांनी त्यांच्या रणनीतीची चांगली अंमलबजावणी केल्याबद्दल त्यांचे कौतुकही केले. संघाने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे; हा पराभव एक अपवाद आहे आणि स्पर्धा अजून सुरुवातीच्या टप्प्यात आहे. रहाणेने कबूल केले की, त्याला आपल्या संघाच्या संयोजनावर पुनर्विचार करण्याची गरज आहे, कारण घरच्या मैदानावरचे सामने महत्त्वाचे आहेत आणि त्यांना या सामन्यांमधून गुण मिळवणे आवश्यक आहे. शेवटी, संघाला फक्त सकारात्मक मानसिकतेने आणि अधिक जागरूकतेने पुढे जाण्याची गरज आहे आणि असे केल्याने ते निश्चितपणे चांगली कामगिरी करतील.कोलकाता नाइट रायडर्सकडून खेळताना वेगवान गोलंदाज ब्लेसिंग मुझारबानीने 4 षटकांत 41 धावा देऊन 4 बळी घेतले. सनरायझर्स हैदराबादकडून जयदेव उनाडकटने सर्वाधिक 3 बळी घेतले, तर इशान मलिंगाने 2 बळी घेतले.

# श्रेयसच्या मनगटाला फ्रॅक्चर; CSK विरुद्ध मॅच खेळणार की नाही? कोचकडून अपडेट

**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 मध्ये, पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यर गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात जखमी झाला होता. कूपर कॉनेलीच्या शॉटमुळे त्याच्या हाताला दुखापत झाली, ज्यामुळे तो वेदनेने ओरडत जमिनीवर कोसळला. आता उद्या पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्जमध्ये सामना रंगणार आहे. या सामन्यापूर्वी आता अय्यरच्या दुखापतीबाबत अपडेट समोर आली आहे.श्रेयस अय्यरची दुखापत खूप गंभीर दिसत होती, परंतु त्याच्या चाहत्यांसाठी दिलासादायक बातमी आली आहे. पंजाब किंग्सचे सहाय्यक प्रशिक्षक ब्रॅड हॅडिन यांनी सांगितले की, श्रेयस अय्यरचा हात फ्रॅक्चर झालेला नाही, परंतु त्याचा हात सुजला आहे. श्रेयस अय्यरचा हात सुजला आहे आणि दुखत आहे, त्यामुळे तो चेन्नईविरुद्धच्या सामन्यात खेळू शकेल की नाही हा प्रश्न आहे. ब्रॅड हॅडिन यांनी सांगितले की श्रेयस अय्यरचा हात सुजला आहे, परंतु तो चेन्नईविरुद्ध खेळू शकतो. पंजाबचा पुढील सामना 3 एप्रिल रोजी चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध होणार आहे. हा सामना चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियमवर सायंकाळी 7:30 वाजता खेळला जाईल.

पहिल्या सामन्यात अय्यर केवळ 18 धावांवर बाद झाला, पण तो चांगल्या लयीत दिसत होता. त्याने आधीच दोन षटकार मारले होते, पण त्यानंतर कूपर कॉनोलीच्या एका जोरदार फटक्याने त्याच्या हाताला दुखापत झाली. चेंडू लागल्यानंतर श्रेयस वेदनेने कोसळला. पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. मात्र, आता पंजाबला अय्यरच्या बॅटमधून अधिक धावांची अपेक्षा असेल. गेल्या हंगामात श्रेयस अय्यरने 17 सामन्यांमध्ये 175.07 च्या स्ट्राइक रेटने 6.04 धावा केल्या होत्या. त्याची फलंदाजीची सरासरी 50.33 होती आणि त्याने सहा अर्धशतके झळकावली होती. चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध श्रेयस अय्यरची कामगिरी खराब राहिली आहे. त्याने 15 सामन्यांमध्ये केवळ 371 धावा केल्या आहेत. चेन्नईविरुद्ध अय्यरची सरासरी केवळ 28.53 असून त्याचा स्ट्राइक रेट 115.93 आहे.

# मुंबई इंडियन्सच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी; दिल्लीविरुद्ध मॅचपूर्वी MI ने शेअर केलेल्या व्हिडिओ जोरदार चर्चा



**मुंबई/वृत्तसंस्था** : आयपीएल 2026 ची सुरुवात मुंबई इंडियन्सने जिंकून केली. पहिला सामना कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध खेळले होते. हा सामना वानखेडे स्टेडियमवर रंगला होता जो मुंबईने जिंकला. आता पुढील सामना दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध असणार आहे. दिल्ली हा सामना रंगणार असून या सामन्यापूर्वी आता मुंबई इंडियन्स च्या चाहत्यांसाठी मोठी बातमी येत आहे. संघात फिरकी गोलंदाज सामील होत आहे.

विजयाने IPL 2026 ची सुरुवात करणाऱ्या मुंबई इंडियन्ससाठी आनंदाची बातमी आली आहे. न्यूझीलंडचा फिरकी गोलंदाज मिचेल सँटनर संघात सामील झाला असून, 4 एप्रिल रोजी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यासाठी तो निवडीसाठी उपलब्ध होऊ शकतो. क्रिकबझच्या वृत्तानुसार, मिचेल सँटनर दिल्लीत मुंबई इंडियन्स संघात सामील झाला आहे, जिथे दोन्ही संघांमधील पुढील सामना अरुण जेटली क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाणार आहे. शनिवारी दिल्लीविरुद्धच्या सामन्यात सँटनर मुंबईच्या प्लेइंग इलेव्हनचा भाग असू शकतो. मुंबईने आयपीएल 2026 ची सुरुवात दणदणीत विजयाने केली.मुंबई इंडियन्सने आयपीएल 2026 साठी सँटनरला संघात कायम ठेवले आहे. 2025 च्या हंगामापूर्वी त्याला 2 कोटी रुपयांना संघात घेण्यात आले होते. गेल्या हंगामात त्याने 13 सामने खेळून 7.92 च्या इकॉनॉमी रेटने 10 बळी घेतले होते आणि फलंदाजी करताना 40 धावा देखील केल्या होत्या. त्याला चेन्नई सुपर किंग्सकडून खेळण्याचा पूर्वीचा आयपीएल अनुभव आहे, जिथे तो 2023 मध्ये संघाच्या विजेतेपदाच्या मोहिमेचा एक भाग होता.सँटनरने न्यूझीलंडसाठी मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली आहे. 2026 च्या पुरुष टी-20 विश्वचषकात, त्याने संघाचे नेतृत्व करत संघाला उपविजेतेपद मिळवून दिले; या स्पर्धेदरम्यान, त्याने 142.85 च्या स्ट्राईक रेटने 120 धावा केल्या आणि 6.60 च्या इकॉनॉमी रेटने दोन बळी घेतले. विल जॅक्स संघात अजून सामील झाला नाही. तो केव्हा सामील होईल याबाबत अद्याप कोणतीही माहिती मिळालेली नाही. शनिवारी दिल्ली आणि मुंबईमध्ये सामना रंगेल.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




# ‘धुरंधर 2’च्या त्सुनामीमुळे ‘भूत बंगला’, ‘मातृभूमी’, ‘पेट्रियॉट’सह अनेक बिग बजेट चित्रपटांनी टाळली थेट टक्कर



धुरंधर : द रिव्हेंज' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर कमाईची इतकी मोठी लाट आणली आहे की त्यापुढे कोणाचाच निभाव लागणं कठीण दिसत आहे. म्हणून रणवीर सिंहच्या या चित्रपटाच्या त्सुनामील घाबरून अनेक चित्रपटांच्या निर्मात्यांनी मोठा निर्णय घेतला आहे.आदित्य घर दिग्दर्शित ‘धुरंधर 2’ हा चित्रपट 19 मार्च 2026 रोजी जगभरातील थिएटर्समध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर एक असं तुफान आणलं, ज्याच्यासमोर कोणताच चित्रपट टिकू शकत नाहीये. तीन महिन्यांपासून रणवीर सिंहच्या या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने प्रतीक्षा करत होते. 5 डिसेंबर 2025 रोजी ‘धुरंधर’ हा पहिला भाग प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. त्यानंतर जेव्हा ‘धुरंदर 2’ची घोषणा झाली, तेव्हा इतर सर्व निर्मात्यांनी एक पाऊल मागे घेण्याचा निर्णय घेतला होता. हीच गोष्ट अद्यापही पाहायला मिळत आहे. एप्रिलमध्ये प्रदर्शित होणारे अनेक मोठे चित्रपट मे किंवा जूनपर्यंत पुढे ढकलण्यात आले आहेत. या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.अक्षय कुमारचा ‘भूत बंगला’ हा चित्रपट मार्च महिन्यात प्रदर्शित होणार होता. आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख एप्रिलपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. हा हॉरर कॉमेडी चित्रपट प्रेक्षकांनी आरामात पहावा आणि इतर कोणत्याही चित्रपटांशी त्याने संघर्ष टाळावा, अशी निर्मात्यांची इच्छा आहे. त्यामुळे या चित्रपटाचे पेड प्रीव्हू आता 16 एप्रिलपासून सुरू होणार आहेत. तर सलमान खानचा ‘मातृभूमी’ हा चित्रपट 17 एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र ‘बॉलिवूड हंगामा’ने दिलेल्या एका वृत्तानुसार आता हा चित्रपट 15 मे रोजी प्रदर्शित होऊ शकतो. यामागचं आणखी एक कारण म्हणजे या चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारलेले अभिनेते प्रशांत यांच्या निधनामुळे काही चित्रीकरण अपूर्ण राहिलं आहे. म्हणून त्याचं प्रदर्शन पुढे ढकललं जात आहे.साऊथ सुपरस्टार्सचीही माघार

‘भूत बंगला’ आणि ‘मातृभूमी’ याशिवाय साऊथ सुपरस्टार मोहनलाल आणि ममूटी यांचा ‘पेट्रियॉट’ हा चित्रपट 23 एप्रिल रोजी प्रदर्शित होणार होता. या चित्रपटाचीही तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. आता हा चित्रपट 1 मे रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. याविषयीची माहिती अभिनेते ममूटी यांनी स्वतः सोशल मीडियाद्वारे दिली. याशिवाय ‘दृश्यम 3’ आणि ‘पेड्डी’ यांसारख्या चित्रपटांच्याही प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे.या सर्वांत आणखी एका मोठ्या चित्रपटाने प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्या निर्णय घेतला होता. ‘केजीएफ’ फेम यशची मुख्य भूमिका असलेला ‘टॉक्सिक’ हा चित्रपट ‘धुरंदर 2’ सोबतच 19 मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार होता. या दोन चित्रपटांमध्ये मोठी बॉक्स ऑफिस टक्कर होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

## संजय दत्तच्या रेस्टॉरंटमधील जिवंत माशाच्या कॉकटेलनं गोंधळ



संजय दत्त त्याच्या 'धुरंधर २' या सिनेमामुळे चर्चेत आहेच पण त्याचबरोबर अभिनेता आणखी एका कारणामुळे चर्चेत आला आहे. अभिनेता संजय दत्तने त्याच्या रेस्टॉरंट-बारच्या मेन्यूमधून जिवंत मासा असलेलं कॉकटेल काढून टाकलं आहे. संजय दत्नेत काही दिवसांपूर्वी या कॉकटेलची एक जाहिरात पोस्ट केलेली. कॉकटेलमध्ये एक जिवंत मासा असून त्याच्यावर आग पेटलेली दिसत होती. अभिनेत्याच्या पोस्टवर अनेक नकारात्मक प्रतिक्रिया आल्या. ॲनिमल वेलफेअरच्या कार्यकर्त्यांनीही या कॉकटेलच्या विरोधात आवाज उठवला. त्यामुळे हे कॉकटेल मेन्यूमधून काढून टाकण्यात आलं आहे

संजय दत्तने मार्च महिन्यात त्याचा मित्र अभिमन्यू जाखरसोबत 'अल्ता स्टेला' नावाचं रेस्टॉरंट आणि बार सुरू केलं. त्याच्या इन्स्टाग्राम पेजवर मेन्यू, खाद्यपदार्थ आणि कॉकटेल संबंधित अनेक पोस्ट आहेत. संजयने एका कॉकटेलमध्ये एक जिवंत मासा तरंगताना आणि त्याच्यावर आग पेटलेली दाखवणारी एक पोस्टही टाकली होती. ही पोस्ट व्हायरल होताच अनेकांनी आक्षेप घेतला. रेस्टॉरंटने आता आपल्या मेन्यूमधून हे कॉकटेल काढून टाकलं आहे आणि इन्स्टाग्रामवर यासंबंधी एक पोस्ट शेअर आहे.ही पोस्ट शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलं की, 'प्रत्येक गोष्ट ठरल्याप्रमाणे होत नाहीत. आम्ही खूप चांगलं काम करत आहोत. ज्या चिंता व्यक्त केल्या जात आहेत त्याचा आंम्ही विचार केला. आम्ही प्राण्यांच्या संरक्षणाला नेहमीच गांभीर्याने घेतलं आहे. एबियस कॉकटेल हे मीन राशीपासून प्रेरित होतं. बेट्टा माशांना फायटर फिश म्हणूनही ओळखलं जातं. हे मासे एकटे राहतात आणि पाण्यावर श्वास घेऊ शकतात, म्हणूनच त्यांना एकटं ठेवलं जातं. कॉकटेलमधील जिवंत माशांबद्दलची चिंता योग्य आहे. त्यामुळे, हे कॉकटेल यापुढे दिलं जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे.'दरम्यान, संजय दत्तने 'धुरंधर' या चित्रपटात एक महत्त्वाची भूमिका साकारली आहे.

## लाडका ज्यूनियर-जी कुठे गायब झाला, आता नेमका कसा दिसतो? समोर आलेली माहिती वाचून धक्काच बसेल!

कधीकाळी 90 च्या दशकात मुकेश खन्ना यांची ‘शक्तिमान’ ही मालिका संपूर्ण देशात प्रसिद्ध होती. या मालिकेत मुखेश खन्ना यांनी शक्तिमानची भूमिका साकारली होती. ही मालिका सुरू झाल्यावर लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सगळेजण दुरदर्शन सुरू करून बसायचे. त्यानंतर 2001 साली शक्तिमानला टक्कर देणारी ‘ज्यूनियर जी’ ही मालिका आली. या मालिकेलाही लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. या मालिकेत अभिनेता अमितेश कोचर यांने ज्यूनियर जीची भूमिका साकारली होती. त्याने साकारलेल्या सुपरहिरोच्या भूमिकेच्या अनेकजण प्रेमात पडले होते. दरम्यान, आता हाच ज्यूनियर जी म्हणजेच अमितेश कोचर मात्र अभिनय क्षेत्रापासून खूप दुर आहे. तो नेमका कुठे आहे? ते नेमका कसं आयुष्य जगतोय? याबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.ज्यूनियर जी या मालिकेत भूमिका केल्यामुळे अमितेश कोचर तेव्हा रातोरात स्टार झाला होता. या मालिकेत काम करत असताना तो अवघ्या 12 ते 13 वर्षांचा होता. आता मात्र तो अभिनयापासून खूप दूर आहे. ज्यूनियर जी या मालिकेत त्याने बालकलाकार



म्हणून ‘गौरव’ची भूमिका साकारली होती. ज्यूनियर जी या मालिकेतील गौवर म्हणजेच ज्यूनियर जी आता खूप मोठा झाला आहे. तो एक ट्रॅव्हलर आहे. त्याला फिरायला खूप आवडतं.त्याच्या सोशल मीडिया खात्यावर नजर टाकली तर त्याच्या फिरण्याच्या आवडीविषयी तुम्हाला समजेल. त्याचे एक यूट्यूब चॅनेलही आहे. फिरायला गेल्यानंतर तो तेथील व्लॉग्स आपल्या या चॅनेलवर अपलोड करतो. त्याच्या यूट्यूब चॅनेलचे नाव ‘Amitesh Vlogs’ असे आहे. विशेष म्हणजे अमितेशचे लग्नही झालेले आहे. अेक व्लॉग्समध्ये तो आपल्या पत्नीसोबतही दिसतो. त्याला पाळीव प्राणी खूप आवडतात. त्याच्याकडे एक कुत्रा आहे. त्या कुत्र्यावर तो खूप प्रेम करतो.दरम्यान, लहानपणी साकारलेल्या भूमिकेमुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेला हा अमितेश आता मात्र बॉलिवुडमध्ये सक्रिय नाही. त्याला मनमुराद आयुष्य जगायला आवडते. आपल्या काही ब्लॉग्समध्ये तो ज्यूनियर जी या मालिकेबद्दल बोलतानाही तुम्हाला दिसेल.

## सोनाली बेंद्रे आणि नवरा गोल्डी प्रचंड अडचणीत; थेट कोर्टातच खेचलं

बॉलिवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे ही कायमच चर्चेत असते. कधी तिच्या लूकमुळे तर कधी तिच्या चित्रपटांमुळे. सध्या सोनाली खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. सोनाली आणि तिचा पती गोल्डी बहल यांनी खरेदी केलेल्या जमीनीवरुन वाद झाला आहे. या जमिनीवरुन त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. मावळ तालुक्यातील उकसान येथील शेतजमिनीच्या वादावरून बॉलिवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि तिचा पती गोल्डी बेहल अडचणीत सापडले आहेत. स्थानिक शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी वडगाव मावळ येथील दिवाणी न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांनी संबंधित जमीन ही वडिलोपार्जित कुळ हक्काची असल्याचा दावा केला आहे. कुळकायद्यानुसार १९५७ पूर्वीपासून ताब्यात असलेल्या ३० गुंठे जमिनीवर हक्क असताना, खोट्या कागदपत्रांच्या आधारे हा हक्क डावलून जमीन विकत घेतल्याचा गंभीर आरोप सोनाली बेंद्रे आणि तिचा पती गोल्डी बहलवर करण्यात आला आहे.तसेच, संबंधित जागेवर बेकायदेशीर बांधकामाचा प्रयत्न आणि कुटुंबीयांना दमदाटी केल्याचाही आरोप आहे.या प्रकरणी आधी पोलिसांत तक्रारी दाखल झाल्या होत्या, मात्र हे प्रकरण दिवाणी स्वरूपाचे असल्याने न्यायालयात दाद मागण्यात आली. सध्या न्यायालयात मनाई आदेशाची मागणी करण्यात आली असून, पुढील सुनावणी २० एप्रिल रोजी होणार आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे मावळ तालुक्यातील उकसान गावात एकच खळबळ उडाली आहे. मावळ तालुक्यातील उकसान येथील शेतजमिनीच्या वादात बॉलिवूड अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि त्यांचे पती गोल्डी बेहल यांच्या बाजूने त्यांच्या वकील राजू शिंदे यांनी सर्व आरोप फेटाळले आहेत. वकील राजू शिंदे यांनी सांगितले की, सोनाली बेंद्रे यांच्या नावावर ही जमीन मुळातच नाही. त्यामुळे या प्रकरणाशी सोनाली बेंद्रे यांचा थेट संबंध नाही. तरीही त्यांच्यावर खोटे आरोप करण्यात येत आहेत. ८ जून १९६५ रोजी मावळच्या तत्कालीन तहसीलदारांनी दिलेल्या आदेशानुसार, केसू शिंदे हे त्या जमिनीचे मालक नसल्याचे स्पष्ट झाले होते. यापूर्वी अनेक वेळा तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी (SDO) स्तरावर अपील करण्यात आले. मात्र, प्रत्येक वेळी निर्णय चंद्रकांत शिंदे यांच्या विरोधातच गेला. ऑक्टोबर २०२५ मध्ये मावळ तहसीलदारांनी चंद्रकांत शिंदे यांची अपील फेटाळली होती. त्यानंतरही त्यांनी उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पुन्हा अपील केले. वकील राजू शिंदे यांच्या म्हणण्यानुसार, केवळ पैसे उकळण्याच्या हेतूने हे प्रकरण वारंवार उकरून काढले जात आहे.



दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मध्य महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा; नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

भारतीय हवामान विभागाच्या ३० मार्च २०२६ रोजीच्या पाच दिवसीय अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीज चमकणे, गारपीट आणि वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाने दिलेल्या सूचनांनुसार, विजेचा कडकडाट ऐकू आल्यास तात्काळ घरात किंवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. झाडाखाली, शेतात, पाण्याजवळ किंवा लोखंडी वस्तूंच्या जवळ उभे राहणे टाळावे. मोकळ्या जागेत मोबाईल फोनचा वापर करू नये. तसेच निवाऱ्यापासून दूर असल्यास जमिनीवर न पडता पाय एकत्र करून बसून राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. ग्रामपंचायत, पोलीस आणि आरोग्य विभागामार्फत तातडीने जनजागृती करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिका व अग्निशमन दल सतर्क ठेवण्यात यावेत, तसेच शाळा, सभागृहे व सार्वजनिक इमारती सुरक्षित आश्रयस्थळ म्हणून खुले ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हवामान खात्याचे अद्ययावत संदेश गावपातळीपर्यंत पोहोचवण्यावरही भर देण्यात आला आहे. शेतकरी बांधवांनी विजेच्या इशाऱ्याच्या काळात शेतातील कामे टाळावीत, बांधकाम स्थळांवरील कामकाज तात्पुरते थांबवावे, तसेच यात्रास्थळे व मोठ्या जमावाचे कार्यक्रम तातडीने स्थगित करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे, असे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# स्वयंभू मारोती संस्थानात हनुमान जन्मोउत्सवाची महाप्रसादाने सांगता



जनसंचलन/बुलढाणा

येथील स्वयंभू मारोती संस्थान येथे हनुमान जयंती निमित्त हनुमान जन्मोउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सावाची आज २ एप्रिल रोजी महाप्रसादाने सांगता करण्यात आली. शहरातील प्रत्रकार भवन परिसरातील स्वयंभू मारोती संस्थानात ४१ वर्षा पासून हा उत्सव साजरा करण्यात येतो. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी हनुमान जयंती नमित्त हनुमान जन्मोउत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या निमीत्त १ एप्रिल रोजी सुनिल जोशी यांचे शारदा भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. तर आज २ एप्रिल रोजी गुरुवारी सकाळी ६ वाजता हनुमंतरायाचा जन्मोतउत्सव पार पडला. सकाळी १० ते १२ लोकजागरण मंचचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर दुपारी १२ ते ४ वरण, भात, पोळी, वांग्याची भाजी, बुंदी असा महाप्रसादाचे वाटप करण्यात येवून जन्मोउत्सवाची सांगता करण्यात आली. यावेळी स्वयंभू मारोती संस्थान मित्रमंडळ, बुलढाणा यांनी परिश्रम घेतले.

# प्राचार्य संतोष डवले यांचा प्रेरणादायी नेतृत्व पुरस्काराने गौरव...

## बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्यामजी चांडक (भाईजी) यांच्या हस्ते सन्मान




जनसंचलन/बुलढाणा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृती दिनानिमित्त चाणक्य बहुउद्देशीय संस्था सुंदरखेड द्वारा संचालित सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि हरिसिद्धी विद्या धाम अकॅडमी यांच्या वतीने बुलढाणा तालुक्यातील प्राचार्य व मुख्याध्यापक यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष प्रसंगी ज्ञानदेवराव बापू दांडगे विद्यालय, धाडचे प्राचार्य श्री. संतोष वसंतराव डवले यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील समर्पण, कर्तव्यनिष्ठा आणि नाविन्यपूर्ण विद्यार्थी शिक्षण कार्यपद्धतीबद्दल प्रेरणादायी नेतृत्व पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष आदरणीय राधेश्यामजी चांडक (भाईजी) यांच्या शुभहस्ते श्री. डवले यांचा हा सन्मान संपन्न झाला. या सोहळ्याला चाणक्य बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष प्रा. विजयजी गणपत महाजन आणि पी.आर.ओ. सुनीलजी तिजारे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य संतोष डवले यांना मिळालेल्या या गौरवपूर्ण सत्काराबद्दल दांडगे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. मनोजभाऊ दांडगे, विश्वस्त श्री. संतोष दांडगे आणि सचिव श्री. उमेश दांडगे यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. श्री.डवले यांच्या या यशामुळे शैक्षणिक क्षेत्रातून आणि धाड परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तांदुळवाडी अंगणवाडीचा कायापालट

जनसंचलन/बुलढाणा

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत बुलढाणा जिल्ह्यातील रूम्हणा ग्रामपंचायतीने विकासकामांचा धडाका लावला आहे. या अभियानांतर्गत तांदुळवाडी येथील अंगणवाडी केंद्रात मूलभूत सुविधांचे बळकटीकरण करून हे केंद्र अधिक सक्षम करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीच्या या यशस्वी वाटचालीची दखल आता थेट मंत्रालयाने घेतली असून, शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर या कार्याचा गौरव करण्यात आला आहे. रूम्हणा ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी श्री. विनोद सातपुते आणि ग्रामपंचायत सदस्य तथा भगवानबाबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री. शिवराज कायंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गावात अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक मदत गरजू विद्यार्थ्यांना पुस्तक, वही आणि पेन यांचे वाटप. शासकीय अभियान: बेटी बचाव-बेटी पढाओ, स्वच्छ भारत अभियान आणि राष्ट्रीय पोषण अभियान यांची प्रभावी अंमलबजावणी ,सांस्कृतिक वारसा प्रत्येक महापुरुषाची जयंती उत्साहात साजरी करून सामाजिक प्रबोधन. पर्यावरण रक्षण: अंगणवाडी परिसरात नवीन बांधकाम करण्यासोबतच मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून परिसर हरित करण्यात आला आहे.मंत्रालयातून उपक्रमांची दखल तांदुळवाडी अंगणवाडी केंद्रात राबविण्यात आलेल्या या सर्व उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयातून श्री. हरीश बावस्कर यांनी केंद्राला भेट दिली. यावेळी त्यांनी अंगणवाडीच्या कार्याची ध्वनी चित्रफीत (व्हिडिओ) तयार केली. या प्रक्रियेत अंगणवाडी सेविका प्रिया तेजकोर प्रकाश खरात यांची विशेष मुलाखत घेण्यात आली.



# विधवा परिषद ठरली एकल महिलांसाठी सन्मान चळवळ...

## बापाशिवाय मुलांचे संगोपन म्हणजे आईच्या कसोटीचे क्षण - एसडीओ सानप

जनसंचलन/बुलढाणा

वडील गेल्या नंतर वैधव्य झेलत मुलांचे संगोपन करणे सोपी गोष्ट नाही.मुलांना लहानाचे मोठे करतांना आईची खरी कसोटी लागते.असे प्रतिपादन मेहकर एसडीओ प्रशांत सानप यांनी केले. तर एकल महिलांच्या हक्काचा लढा अधिक व्यापक करण्याची गरज असल्याचे प्रा.डी एस लहाने म्हणाले.हिवरा आश्रम येथे विधवा व एकल महिला परिषद ३१ मार्च रोजी पार पडली, यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विवेकानंद आश्रमाचे उपाध्यक्षा अशोकराव थोरहाते होते.मेहकर एसडीओ प्रशांत सानप, मुख्याधिकारी रामराजे कापरे, आश्रमाचे सचिव अशोकराव गोरे, पंढरीनाथ शेळके, मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. डी एस लहाने, प्रा. शाहिनाताई पठाण आदी उपस्थित होते. एकल व विधवा महिला सन्मान चळवळ प्रा. डी एस लहाने यांच्या संकल्पनेत बुलढाण्यात सुरू झाली. विधवा व एकल महिलांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांना समाजामध्ये सन्मानाचे जीवन जगता यावे यासाठी मानस फाउंडेशनच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहे. हिवराआश्रम येथे याच उद्देशाने एकल महिला व विधवा



परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आयोजित परिचय मेळाव्यात अनेक विधवा महिला व विवाह इच्छुक तरुणांनी सहभाग नोंदविला. विशेष बाब म्हणजे विवाह इच्छुक तरुण तरुणींचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. दुपारी बारा वाजता सावित्रीबाई फुले,शुकदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक व भूमिका प्रा. डी एस लहाने यांनी विशद केली. महिला सन्मान चळवळ अधिक व्यापक करणे, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविणे, त्याचा शासन दरबारी पाठपुरावा करणे आदि कामे मानस फाउंडेशनच्या माध्यमातून सुरू असल्याचे लहाने म्हणाले. शुकदास महाराज यांनी परिवर्तनच सांगितले आहे. हिवरा आश्रम मध्ये एकल महिलांना रोजगार दिल्या जातो, तो यापुढे दिल्या जाईल, त्यांच्या आयुष्यातून विधवा किंवा गंगाभागीरथी शब्द कायमचे नष्ट व्हावे असे संतोष गोरे म्हणाले. वेगळ्याच प्रश्नावर आयोजित आजची विधवा परिषद ही परिवर्तनाची नांदी असून या महिलांच्या समस्या किती गंभीर असू शकतात याची जाणीव करून देणारा आजचा कार्यक्रम असल्याचे मुख्याधिकारी रामराजे कापरे म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष थोरात यांनी प्रभावीपणे आपले विचार व्यक्त केले. यावेळी अनेक व्यक्तींनी आपली मते मांडली तर विधवा व एकल महिलांनी आपापल्या समस्या मांडल्या. यानंतर परिचय मेळावा पार पडला. त्याला मोठा प्रतिसाद दिसून आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य शाहीनाताई पठाण यांनी तर आभार प्रदर्शन संदीप जाधव यांनी केले.कार्यक्रमास फाउंडेशनचे गजानन मुळे, दिनकर पांडे, पंजाबराव गवळी, जाधव काका, निलेश गाडेकर, प्रज्ञाताई लांजेवार ,अनिताताई कापरे यांच्यासह हिवराश्रमच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

---

# क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिरातून घडतील उत्कृष्ट खेळाडू-कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर

## बुलढाणा जिल्हा क्रीडा संकुलात उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा प्रारंभ

जनसंचलन/बुलढाणा




उन्हाळी सुटीचा सदुपयोग करून मुलांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने आयोजित ग्रीष्मकालीन क्रीडा व व्यक्तिमत्व विकास शिबिर हे भविष्यातील उत्कृष्ट खेळाडू घडवण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरेल, असा विश्वास जिल्हा कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर यांनी व्यक्त केला. क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे), जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत आयोजित या शिबिराचा उद्घाटन सोहळा जिल्हा क्रीडा संकुल, जाभरून रोड येथे उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा स्काऊट अँड गाईड अधिकारी कविता पवार आणि सुनील जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. मेघा बाहेकर यांनी आपल्या मार्गदर्शनातून शिबिरार्थींना खेळाचे महत्त्व पटवून दिले व व्यक्तिमत्व विकासावर भर दिला. कविता पवार यांनी शिबिराच्या माध्यमातून मुलांमध्ये खेळाची गोडी निर्माण करणे हा मुख्य उद्देश असून, विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हा क्रीडा मार्गदर्शक उज्वला लांडगे यांनी प्रास्ताविकात शिबिराच्या रूपरेषेबद्दल माहिती दिली. या शिबिरात केवळ मैदानी खेळच नव्हे, तर मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.यामध्ये ॲथलेटिक्स, हॅण्डबॉल, फुटबॉल, खो-खो, कबड्डी, जिम्नॅस्टिक्स आणि स्पोर्ट्स नर्सरी, तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला, वादविवाद, सामान्य ज्ञान, सुंदर हस्ताक्षर, नृत्य स्पर्धा आणि ॲरोबिक्स, लाठीकाठी, प्राणायाम, दंतचिकित्सा आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंचे विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे. हे शिबिर दोन सत्रांत चालणार असून सकाळी ६.१५ ते ८.१५ आणि सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत प्रशिक्षण दिले जाईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जीवन मोहोड यांनी, तर आभार प्रदर्शन उज्वला लांडगे यांनी केले. जिल्हा क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी हे शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत.

---

# राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांचा जिल्हा दौरा

जनसंचलन/बुलडाणा

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) शेरसिंग रुक्कानसिंग डागोर हे मंगळवार व बुधवार दि. ७ व ८ एप्रिल रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आहे. दौऱ्यामध्ये सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी संदर्भात विविध विभागाचा आढावा घेणार आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार मंगळवार दि. ७ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजता शेगाव सर्कीट हाऊस येथे आगमन व राखीव. बुधवार दि. ८ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शेगाव येथून बुलढाणाकडे प्रयाण, दुपारी १२ वाजता सफाई कर्मचारी संघटना सोबत बैठक व चर्चा. दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत भोजन व राखीव. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे बाबतच्या अधिनियम २०१३ ची अंमलबजावणी बाबत तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व अडीअडचणी निवारणाकरीता केलेल्या उपाययोजना संदर्भात आढावा बैठक. बैठकीनंतर पत्रकार परिषद होईल. सायंकाळी ५ वाजता सफाई कर्मचाऱ्यांच्या वस्त्यांना भेट व चर्चा. त्यानंतर रात्री ७ वाजता बुलढाणा सर्कीट हाऊस येथे मुक्काम.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८